भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2020 ◐ 24-12-22 BA 023384

अ. क्र. ७१६८ किंमत रुपये पाचशे रु.

नांव देवझिरा फार्मर प्रोडयुसर कंपनी लि. रोहोड

हस्ते

हस्ते कैलास गांगुर्डे

प्रकाश ए. ततार
पिंपळनेर ता. साक्री जि. धुळे
परवाना क्र. 19/200..

उपकोषागार कार्यालय
साक्री, जि धुळे
20 DEC 2022
उपकोषागार अधिकारी
साक्री, जि धुळे

व्यवस्थापकीय संचालक,

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित,नाशिक

आणि

देवझिरा शेतकरी उत्पादक कंपनी लिमिटेड, मु.पो. रोहोड.
ता. साकी जि. धुळे

यांच्यामध्ये

**Maize Procurement, Storage & Market Linkages**

या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याकरिता

SHABARI ADIWASI VITTA VA VIKAS MAHAMANDAL MARYADIT * NASHIK

Devzira Farmer Producer Company Ltd Rohod Tal.Sakri Dist.Dhule * U01409 MH 2021 PTC365096

# सामंजस्य करार

हा सामंजस्य करार (इथून पुढे "MoU" म्हणून ओळखला जाईल) **२८ डिसेंबर २०२२** ला, नाशिक महाराष्ट्र येथे खालील नमूद पक्षकारांमध्ये झाला.

**पक्ष नं. १-**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक, आदिवासी विकास भवन, गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक, महाराष्ट्र राज्य (यापुढे "शबरी महामंडळ" म्हणून संबोधण्यात येईल) कंपनी कायदा १९५६ मधील तरतुदीनुसार स्थापन झालेली कंपनी यांचे तर्फे **श्रीमती. लीना बनसोड, भा.प्र.से., व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित, नाशिक.**

**आणि**

**पक्ष नं. २-**

देवझिरा शेतकरी उत्पादक कंपनी लिमिटेड मु. पो. रोहोड, ता. साक्री, जि. धुळे ही कंपनी कायदा २०१३ अन्वये नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपनी असून कंपनीचे कार्यालय मु. पो. रोहोड, ता. साक्री, जि. धुळे येथे आहे (यापुढे "देवझिरा FPC" म्हणून संबोधण्यात येईल). **श्री. कैलास सैल्या गांगुर्डे, अध्यक्ष व सौ. हिराबाई सोमनाथ गांगुर्डे, सचिव** (आज रोजी नाशिक येथे मुक्कामी) हे देवझिरा FPC चे अधिकृत प्रतिनिधी असून त्यांना या करारनाम्यावर स्वाक्षरीचे अधिकार देण्याबाबतचा ठराव पारित करण्यात आलेला आहे.

वरील नमूद दोन्ही पक्षकार यांना एकत्रित पक्षकार आणि एकटे पक्षकार असे संबोधण्यात येईल.

करणे सामंजस्य करारनामा लिहून ठेवतात ऐसा जे कि,

१. आदिवासींच्या कल्याणाच्या योजनांची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी सन १९७२ मध्ये समाज कल्याण विभागांतर्गत आदिवासी विकास संचनालयाची स्थापना करण्यात आली होती. त्यानंतर १९७६ साली आदिवासी विकास आयुक्तालय सुरु करण्यात आले. दि. २२ एप्रिल १९८२ रोजी स्वतंत्र आदिवासी विकास विभागाची स्थापना करण्यात आली आणि १९८४ पासून आदिवासी विकास विभाग स्वतंत्रपणे कार्यरत आहे. आदिवासी विकास विभागाच्या बळकटीकरणासाठी सन १९९२ मध्ये आदिवासी विकास संचनालय हे आदिवासी विकास आयुक्तालयात विलीन करण्यात आले. आदिवासी समाजाच्या विकास व उन्नतीसाठी शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाची स्थापना आदिवासी विकास विभाग मंत्रालय, मुंबई, शासन निर्णय क्रमांक आविम-२३९६/४५/प्र.क्र.३९/का.-३ मुंबई दिनांक ९ डिसेंबर, १९९८ अन्वये करण्यात आली.

२. शबरी महामंडळाचा उद्देश अनुसूचित जमातीच्या व्यक्तींच्या आर्थिक विकासासाठी व कल्याणासाठी स्वतःच्या जबाबदारीवर किंवा सरकार, संवैधानिक संस्था, कंपन्या, भागीदारी संस्था, व्यक्ती यांच्या सहयोगाने किंवा अशा संघटना, अभिकरण यांच्यामार्फत कृषी उद्योग, लघु उद्योग, वाहतूक, वैद्यकीय, अभियांत्रिकी सारखा इतर धंदा/व्यवसाय, व्यापार किंवा कार्यालय यांच्या माध्यमातून योजना आखणे, प्रचलित करणे, मदत करणे, सल्ला देणे, सहाय्य करणे, वित्तीय सहाय्य करणे, संरक्षण देणे आणि अशा प्रकारचे विविध उपक्रम हाती घेणे हा आहे.

SHABARI ADIVASI VITTA VA VIKAS MAHAMANDAL MARYADIT * NASHIK



Scanned with CamScanner

३. शबरी महामंडळ हे आदिवासी कुटुंबांचे कृषी व कृषी-सलग्न उपजीविका वृद्धीचे कार्य करण्यास इच्छुक आहे. या करिता आदिवासी बहुल भागातील कार्यरत आदिवासी शेतकरी उत्पादक कंपनी, आदिवासी सहकारी संस्था, वनधन केंद्र, आदिवासींचे ग्राम सभा, ग्राम सभांचे फेडरेशन, स्वयं सहायता समूहांचे फेडरेशन इत्यादी यांचे मार्फत कृषी-आधारित मूल्य साखळी निर्मितीचे प्रकल्प तयार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे.

४. केंद्र शासनाकडून विशेष केंद्रीय सहाय्य अनुदान, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५(१) अंतर्गत राज्य शासनास अनुदान प्राप्त होत असते. राज्यात सध्यास्थितीत बहुतांश आदिवासी शेतकरी त्यांचे शेत उत्पादन वैयक्तिकरित्या व्यापाऱ्यांना किंवा परिसरातील प्रक्रिया केंद्रास विक्री करतात. याकरिता सहकारी तत्वावर एकत्रितपणे प्रतवारी यंत्राद्वारे धान्याची साफसफाई, कृषी मालावर प्रक्रिया उद्योग करून त्याची विक्री केल्यास आदिवासी शेतकऱ्यांना चांगली किंमत/भाव मिळून त्यांचा फायदा होऊ शकतो.

५. राज्य शासनाने सन २०१९-२० य आर्थिक वर्षाकरिता केंद्र शासनास प्रस्ताव सादर केलेले होते. सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने जनजाती कार्य मंत्रालय, नवी दिल्ली येथे मुल्यमापन समितीची (Project Appraisal Committee – PAC) बैठक दिनांक १२.०२.२०१९ रोजी आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत केंद्र शासनाने विशेष केंद्रीय सहाय्य अंतर्गत "Organizing FPOs of 15000 Farmers for Processing, Distribution, Branding and Retailing" या योजनेअंतर्गत शेतकरी उत्पादक कंपन्या सक्षम करण्याकरिता रक्कम रु. २४४०.०० लक्ष इतका निधी सन २०१९-२० करिता मंजूर करण्यात आलेला आहे.

६. याकरिता शबरी महामंडळ यांचे नियोजनानुसार शेतकरी उत्पादक कंपन्यांना शेत-उत्पादन प्रक्रिया, वितरण व विक्री या बाबतीत सक्षम करण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुसार शेतकरी उत्पादन कंपन्यांना जाहिरातीद्वारे आवाहन केले होते. त्याच्या प्रतिसादानुसार धुळे जिल्ह्यातील देवझिरा शेतकरी उत्पादक कंपनी लिमिटेड मु. पो. रोहोड, ता. साक्री, जि. धुळे यांचा Maize Procurement, Storage & Market Linkages या आशयाचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

७. सदर प्राप्त प्रस्तावांचे शबरी महामंडळाद्वारे क्षेत्रीय मुल्यांकन करून प्रस्तावामध्ये आवश्यक फेरबदल करण्यात आले. शासन निर्णयात नामिद केल्याप्रमाणे सदर प्रस्तावाचे दिनांक ०७ डिसेंबर २०२२ रोजी योजनेच्या मुल्यांकन समितीसमोर सादरीकरण करण्यात आले. या बैठकीत सदर प्रस्ताव मंजूर करून कार्यान्वित करण्याचे ठरविण्यात आले.

८. शबरी महामंडळामार्फत जा.क्र. श.आ.वि.वि.म./कें.सहा/प्रकल्प/७०३ /२२ दिनांक २८.१२.२०२२ रोजी देवझिरा शेतकरी उत्पादक कंपनी लिमिटेड मु. पो. रोहोड, ता. साक्री, जि. धुळे यांचा "Maize Procurement, Storage & Market Linkages." या प्रकल्पाच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

९. देवझिरा FPC हि शेतकरी उत्पादक कंपनी असून त्याची स्थापना कंपनी कायदा २०१३ नुसार झाली आहे. तसेच त्यांचे Registration No. 306596 व CIN No. U01409MH2021PTC306596 हे आहेत.

१०. या शेतकरी उत्पादक कंपनीत 283 आदिवासी शेतकरी भागीदार सभासद असून सदर शेतकरी उत्पादक कंपनी ५०० पेक्ष्या जास्त शेतकऱ्यांना आपल्या सुविधा पुरविण्याचे उद्दिष्ट आहे.



Scanned with CamScanner

११. देवझिरा FPC मार्फत आदिवासी सभासद शेतकऱ्यांचा मका, नागली, भगर, कांदा, धान इत्यादी खरेदी करून त्यावर प्रतवारी व प्रकिया करून त्याची विक्री करणे, नैसर्गिक साधन संपत्ती व्यवस्थापन इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहेत.

१२. मका उत्पादन हा या परिसरातील शेतकऱ्यांचा मुख्य व्यवसाय असल्यामुळे देवझिरा FPC च्या मार्फत सभासदांचा मका खरेदी करून त्याची साठवणूक करून विक्री करणेसाठी गोडाऊन/शेड व प्रतवारी/प्रक्रिया केंद्र उभारण्याचा मानस देवझिरा FPC चा आहे.

१३. कंपनी मार्फत आदिवासींचे उपजीविका सक्षमीकरण करण्याबाबत अनेक लहान मोठे कार्यक्रम वेळोवेळी राबविण्यात येत आहेत.

१४. देवझिरा FPC शेतकरी सभासदांकडून खरेदी केलेला शेतमाल स्वतः विक्री करणार आहे.

१५. देवझिरा FPC आदिवासी सभासद शेतकरी यांचेकडून वनौपज व शेतमाल विकत घेऊन प्रतवारी/प्रक्रिया करून विविध ठिकाणी विक्री करत आहे. परंतु शेतकऱ्यांचा माल विकत घेण्यासाठी लागणारा खर्च व मालाचा वाहतूक खर्च देवझिरा FPC कडे कमी भागभांडवल असल्यामुळे करणे शक्य होत नसल्याने त्यांना मोठ्या प्रमाणात मालाची खरेदी व विक्री करणे शक्य होत नाही. याकरिता आढावा घेतला असता या शेतकरी कंपनीला कच्चा माल खरेदी करणे व प्रक्रिया केलेल्या मालाची ब्रान्डींग करण्याकरिता खेळते भांडवल आवश्यक असल्याचे दिसून आले. याबाबींची उपलब्धता असल्याशिवाय सदर शेतकरी उत्पादक कंपनी सक्षम होऊ शकणार नाही.

१६. आदिवासी सभासद शेतकरी यांचा मका विकत घेऊन तो वाळवून विक्री करण्याचा मानस देवझिरा FPC चा आहे. या करिता सदर शेतकरी उत्पादक कंपनीला मका वाळवणी यंत्र, मका काढणी यंत्र, प्रतवारी व प्रक्रिया केंद्र तसेच मका साठवणुकीसाठी गोडाऊन/शेड उभारण्याची आवशक्यता आहे.

१७. आदिवासी शेतकरी त्यांच्यावर असलेले कर्ज परतफेड व त्यांच्या गरजा भागविणेसाठी मोठ्या प्रमाणात त्यांचा उत्पादित शेतमाल हा ग्रामीण स्तरावरच विक्री करतात.

१८. परिसरातील शेतकऱ्यांकडून मका विकत घेऊन त्या मालाची प्रक्रिया करून शेतमाल विक्री करणे हा देवझिरा FPC चा मानस आहे. यास्तव शबरी महामंडळ यांचे समवेत देवझिरा FPC काम करून शेतकऱ्यांना प्रशिक्षण, मका काढणी यंत्र, मका वाळवणी यंत्र, शिलाई मशीन, स्वच्छता व प्रतवारी करणे, त्यांचे उत्पादित मालाकरीता वाहतूक व्यवस्था, मका साठवणुकी करिता शेड व खेळते भांडवल उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित आहे. यामुळे परिसरातील आदिवासी शेतकऱ्यांना शेतमालावर प्रक्रिया, पेकेजींग, ब्रान्डींग, मार्केटिंग इ. करिता मदत मिळू शकेल. तसेच त्यांच्या मार्फत प्रक्रिया केलेल्या उत्पादनाची विक्री चांगल्या योग्य भावाने होईल. त्याच प्रमाणे देवझिरा FPC शेतकऱ्यांचे शेती उत्पादकतेत वाढ, प्रशिक्षण, क्षमता वाढ, प्रक्रिया मालाची जाहिरात इत्यादी बाबींकरिता कार्य करेल व त्यासाठी आवश्यक कर्मचारी व संसाधने उपलब्ध करेल. ज्यायोगे शेतकऱ्यांचे उत्पादन किंमतीत मोठ्या प्रमाणात वाढ दिसून येईल.

१९. देवझिरा FPC प्रकल्पांतर्गत मंजूर शेतमाल साठवणुकीसाठी आवश्यक शेडचे बांधकाम करेल.

२०. या करिता "Maize Procurement, Storage & Market Linkages" हा उपजीविका प्रकल्प कार्यान्वित करून त्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या करीता दोन्ही पक्षकारांनी सामंजस्य करार करून नियम, अटी व शर्ती लिहून घेण्याचे ठरवले आहे.

SHABARI ADIVASI VITTA VA VIKAS MAHAMANDAL MARYADIT NASHIK

Devzira ... Producer Company Ltd. ... Tal.Sakri Dist.Dhule U01409 MH 2021 PTC365096



Scanned with CamScanner

**आणि म्हणूनच दोंन्ही पक्षकारांमध्ये ठरल्याप्रमाणे नियम आणि अटी खालील प्रमाणे असतील.**

**१) योजनेचे नावं**

"Organizing FPOs of 15000 Farmers for Processing, Distribution, Branding and Retailing"

**२) उपजीविका प्रकल्पाचे नावं**

"Maize Procurement, Storage & Market Linkages"

**३) योजनेचे लाभक्षेत्र**

धुळे जिल्हयातील साक्री तालुका आदिवासी परिसर.

**४) योजनेसाठी मार्गदर्शक तत्वे**

सदर योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या निधी बाबत पुढीलप्रमाणे मार्गदर्शक तत्वे ठरवून दिलेले आहेत.

१. योजनेसाठी द्यावयाचा निधी हा तीनभागात व टप्प्यात विभागाला जाईल.
२. पहिला भाग म्हणजे प्रकल्प उभारण्यासाठी लागणारी **पायाभूत सुविधा उभी करणे, यंत्र सामग्री, मशिनरी खरेदी, साहित्य खरेदी, आवश्यक बांधकाम, गोदाम उभारणी व इतर अनुषंगिक** बाबींसाठीसाठी लागणारा निधी. हा निधी **सहाय्यक अनुदान (Grant in Aid)** म्हणून दिला जाईल.
३. दुसऱ्या भागात प्रकल्पासाठी लागणारे **क्षमता बांधणी, विपणन व तांत्रिक सहाय्यया सारखे इतर अनुषंगिक खर्च (Capacity Building and Hand holding for Marketing)** साठी लागणारा निधी देण्यात येईल. सदर खर्च हा **सहाय्यक अनुदान (Grant in Aid)** म्हणून दिला जाईल, परंतु हे अनुदान सहाय्य फक्त एक वर्षापुरते मर्यादित असेल. या करिता देवझिरा FPC यांनी त्यांचे खर्चा संदर्भातील नियोजन, programmatic खर्च इत्यादी बाबत सविस्तर तपशील सादर करावयाचा आहे.
४. निधीचा तिसरा भाग म्हणजे **खेळते भांडवल (Working Capital)**, प्रकल्पासाठी लागणारा कच्चा माल खरेदी करणे, मनुष्यबळ, पाणी, विद्‌युत, दररोजचा खर्च भागवण्यासाठी लागणारे भांडवल यासारख्या इतर बाबींसाठी लागणारा खर्च खेळते भांडवल (Working Capital) मध्ये करणे अपेक्षित आहे. खेळते भांडवल (Working Capital) हे कर्ज स्वरुपात उपलब्ध करून देण्यात येईल. खेळते भांडवल (Working Capital) हे ३ वर्षांकरिता शून्य टक्के (०%) व्याज दराने उपलब्ध करून दिले जाईल. तर पुढील ५ वर्षा करिता द. सा. द. शे. तीन टक्के (३%) व्याज आकारण्यात येईल.

SHABARI ADIVASI VITTA VA VIKAS MAHAMANDAL MARYADIT ★ NASHIK

Devzira Farmer Producer Company Ltd Rohod Tal.Sakri Dist.Dhule ★ U01409 MH 2021 PTC365096



Scanned with CamScanner

### ५) वित्तीय तरतूद रु. लाखात

| अ.क्र. | योजना उपशीर्ष | आर्थिक अनुदान सहाय्य | खेळते भांडवल | लाभार्थी हिस्सा | रक्कम (लक्ष) |
|---|---|---|---|---|---|
| १ | शेड उभारणी आणि इलेक्ट्रिक कनेक्शन | १८.०० | - | ४.१० | २२.१० |
| २ | यंत्र सामग्री (Maize Dryer) | २२.०० | - | २.५० | २४.५० |
| ३ | Thresher Machine & Stitching Machine | ४.०० | - | १.५० | ५.५० |
| ४ | जागेचे भाडे | - | - | ३.२४ | ३.२४ |
| ५ | खेळते भांडवल | - | ५४.०० | - | ५४.०० |
| | **एकूण** | ४४.०० | ५४.०० | ११.३४ | १०९.३४ |
| ६ | शबरी महामंडळ व्यवस्थापन खर्च (२%) | | | | २.१९ |
| | **एकुणांत** | | | | १११.५३ |

सदर योजनेकरिता रक्कम रु. ४४.०० लक्ष इतका निधी आर्थिक अनुदान सहाय्य, खेळते भांडवल रक्कम रु. ५४.०० लक्ष, लाभार्थी हिस्सा रक्कम रु. ११.३४ लक्ष व शबरी महामंडळ व्यवस्थापन खर्च रु. २.१९ लक्ष असे एकंदर रु. १११.५३ लक्ष इतकी वित्तीय तरतूद मंजूर करण्यात आलेली आहे.

### ६) योजना राबविणारी यंत्रणा

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या वतीने शाखा व्यवस्थापक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या. नंदुरबार व देवझिरा शेतकरी उत्पादक कंपनी लि., मु. पो. रोहोड, ता. साक्री, जि. धुळे.

### ७) नियंत्रण अधिकारी

व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक व त्यांनी नियुक्त केलेले सक्षम प्राधिकारी.

### ८) योजनेचा उद्देश व हेतु

आदिवासी शेतकरी उत्पादकांच्या शेतमालाची शेतकरी उत्पादक कंपनीच्या माध्यमातून प्रक्रिया व विक्री करणे. मका उत्पादन यांचे माध्यमातून गटशेतीला चालना देऊन उत्पादन क्षमतेत वाढ करून शेतकऱ्याच्या विकासात्मक दर्जा सुधारणे.

### ९) सामंजस्य कराची मुदत

सदर सामंजस्य करार हा दिनांक २८.१२.२०२२ रोजी अस्तित्वात येऊन कार्यारंभ आदेश दिल्यापासून पुढील ३ वर्ष किंवा खेळते भांडवलाची परतफेड करण्यास लागणारा कालावधी किंवा त्याबाबत मुदतवाढ दिलेला कालावधी यापैकी जे नंतर घडेल तो पर्यंत वैध राहील. तसेच सदरील कराराची मुदत वाढविण्याचे संपूर्ण अधिकार हे पक्ष क्रमांक १ यांचे कडे राहील.

SHABARI ADIVASI VITTA VA VIKAS MAHAMANDAL MARYADIT ★ NASHIK

Devzira Farmer Producer Company Ltd. Rohod Tal.Sakri Dist.Dhule ★ U01409 MH 2021 PTC365096



Scanned with CamScanner

## १०) देवझिरा शेतकरी उत्पादक कंपनी लि., मु. पो. रोहोड, ता. साक्री, जि. धुळे कंपनीचे भूमिका, जबाबदारी आणि दायित्वे

शासनाकडून प्राप्त होणा-या निधी करिता देवझिरा FPC खालील बाबींकरिता विवेकपूर्ण जबाबदार असेल.

१. सदर योजना राबविण्याबाबतचे वर्षनिहाय कालबद्ध कार्यक्रम निश्चित केल्यानुसार सदर योजनेची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संयुक्तपणे देवझिरा FPC व शाखा व्यवस्थापक, शबरी महामंडळ, नंदुरबार यांची राहील.

२. देवझिरा FPC साक्री तालुक्यातील २८३ आदिवासी शेतकरी यांचे कडून मका व इतर धान्य योग्य भावाने खरेदी करेल.

३. देवझिरा FPC कंपनी शेतकऱ्यांच्या शेतमालावर प्रतवारी व प्रक्रिया करणेसाठी आवश्यक सुविधा निर्माण करेल. तसेच उत्पादित मालाकरीता प्रक्रिया/प्रतवारी करणेसाठी व शेतमाल माल साठविणेसाठी शेडची उभारणी करेल.

४. देवझिरा FPC कंपनी शेतकरी सभासदांकडून मका खरेदी करणेसाठी मका काढणी यंत्र खरेदी करून शेतकऱ्यांना उपलब्ध करून देईन.

५. देवझिरा FPC शेतकरी सभासदांकडून खरेदी केलेला मका वाळवणीसाठी मका वाळवणी यंत्र खरेदी करेल व कंपनीच्या कार्यक्षेत्रात मका वाळवणी केंद्र स्थापन करेल.

६. देवझिरा FPC ने प्रकल्प ठिकाणी प्रस्तावित स्थापत्य विषयक बाबींबाबतचे (Civil Work) नकाशे, कामाचा आराखडा शबरी महामंडळाने नियुक्त केलेल्या सक्षम प्राधिकरणा मार्फत (Designated Authority) मंजुर करून घ्यावा.

७. या प्रकल्पांतर्गत जे काही स्थापत्य बाबी निर्माण होतील त्या शबरी महामंडळ देवझिरा FPC यांना ३० वर्ष दीर्घकालीन नाममात्र भाडेतत्वावर देईल. जर या स्थापत्य निर्मितीचा दिलेल्या कारणांव्यतिरिक्त इतर कारणांसाठी गैर वापर झाला तर शबरी महामंडळ सदर स्थापत्य वस्तू ताब्यात घेऊन विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून इतर आदिवासी संस्था/FPO/FPC/Group यांना चालवण्यासाठी देतील अथवा स्वतः चालवतील. हे देवझिरा FPC यांना मान्य असेल.

८. देवझिरा FPC शेतमाल उत्पादकतेत वाढ, प्रशिक्षण क्षमता वाढ, प्रक्रिया मालाची जाहिरात इत्यादी बाबींकरिता कार्य करेल व त्याकरिता आवश्यक कर्मचारी व संसाधने उपलब्ध करेल.

९. परिसरातील सभासद शेतकऱ्यांकडून खरेदी करून प्रक्रिया व प्रतवारी केलेल्या मालाचे उत्पादन व विक्री यांचा जमा खर्च ठेवण्याची जबाबदारी देवझिरा FPC ची असेल.

१०. देवझिरा FPC प्रतवारी व प्रकिया केलल्या शेतमालाचे वितरण व विक्री करून प्राप्त झालेल्या किमतीतून उत्पादन खर्च वजा जाता शिल्लक नफ्याचे सम प्रमाणात उत्पादक आदिवासी शेतकरी सभासदांना वाटप करेल. परंतु देवझिरा FPC शिल्लक नफा प्रकल्पांतर्गत मंजूर झालेल्या खेळते भांडवलाचे परतफेड होई पर्यंत किंवा प्रकल्प मंजूर झाले नंतर कमीत कमी ३ वर्ष समप्रमाणात उत्पादक आदिवासी शेतकरी सभासदांना नफ्याचे वाटप करू शकणार नाही.

११. योजनेच्या शासन निर्णयात शासनामार्फत वेळोवेळी झालेल्या सुधारणा देवझिरा FPC यांना बंधनकारक असतील.

१२. देवझिरा FPC यांना प्रथम वर्षी अनुदानाचा पहिला हप्ता रक्कम रु. २२.०० लक्ष व खेळते भांडवल रक्कम रु. ५४.०० लक्ष वितरीत करण्यात येईल. सदर रकमेचा विनियोग/वापर देवझिरा FPC करारात

SHABARI ADIVASI VITTA VA VIKAS MAHAMANDAL MARYADIT NASHIK

Devzira ... Producer Company Ltd Rohod Tal.Sakri Dist.Dhule U01403 MH 2021 PTC365096



Scanned with CamScanner

नमूद केलेल्या बाबींसाठीच करू शकेल. कामाच्या प्रगतीनुसार अनुदानाचा द्वितीय हप्ता रक्कम रु. २२.०० लक्ष इतका वितरीत करण्यात येईल. हे देवझिरा FPC ला मान्य असेल.

१३. योजनेच्या अंतर्गत देण्यात येणारे खेळते भांडवल (Working Capital) हे कर्ज स्वरूपाचे असेल. प्रथम ३ वर्ष या कर्जाचा व्याज दर हा शून्य टक्के (०%) इतका असेल. खेळते भांडवलाची (Working Capital) या कालावधीत परतफेड झाली नाही तर ४ थ्या वर्षापासून पुढील ५ वर्ष या कर्जाचा व्याज दर हा द. सा. द. शे. तीन टक्के (३%) इतका असेल. खेळते भांडवलाचे परतफेडीचे हप्ते व मुदतवाढ ठरविण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक, शबरी महामंडळ, नाशिक यांना असतील. तथापि अशी मुदतवाढ जास्तीजास्त ४ थ्या वर्षापासून पुढील ५ वर्षांपर्यंत असेल. परंतु त्यानंतर देखील सदरील खेळत्या भागभांडवलाची परत फेड नं झाल्यास त्या थकीत रकमेवर द.सा.द.शे. ३% या दराने रक्कम वसूल होईपावेतो व्याज आकारण्यात येईल. तसेच पक्ष क्रमांक २ यांनी सदरील खेळत्या भांडवलाच्या रकमेची परतफेड विहित मुदतीत न केल्यास ती रक्कम जमीन महसुलाची थकबाकी म्हणून त्यांचे कडून वसूल करण्याचे अधिकार पक्ष क्रमांक १ यांना राहतील. हि बाब देवझिरा FPC यांना मान्य व कबुल असून त्याबाबत ते कोणताही वाद उपस्थित करणार नाहीत.

१४. शबरी महामंडळा सोबत करण्यात येणाऱ्या सामंजस्य करारातील सविस्तर अटी व शर्तीनुसार योजना विहित वेळेत पूर्ण करण्याची जबाबदारी देवझिरा FPC यांची असेल.

१५. योजनेच्या प्रगतीबाबतची माहिती वेळोवेळी व्यवस्थापकीय संचालक, शबरी महामंडळ यांना व शासनास सादर करण्याची जबाबदारी देवझिरा FPC यांची असेल.

१६. योजनेच्या वेळोवेळी केलेल्या कामांचा पूर्तता अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) शबरी महामंडळास सादर करणे देवझिरा FPC यांना बंधनकारक असेल.

१७. सदर योजनेंतर्गत निवडण्यात आलेल्या लाभार्थ्यांची यादी व इतर माहिती देवझिरा FPC यांना शबरी महामंडळास वेळोवेळी देणे बंधनकारक असेल.

१८. योजनेंतर्गत झालेल्या खर्चाची बिले, खर्चाचा अहवाल (कर्मचाऱ्यांचे मानधन, व इतर तत्सम खर्च), Vouchers व योजना अंमलबजावणी संबंधीचे आवश्यक कागदपत्रे व माहिती देवझिरा FPC यांना शबरी महामंडळास वेळोवेळी देणे बंधनकारक असेल.

१९. सदर योजनेची अंमलबजावणी करतांना चलचित्र (Video) व छायाचित्रे काढावीत व योजनेची अंमलबजावणी पूर्ण झाल्यानंतर योजनेचा फलनिष्पत्ती अहवाल शासनास सादर करण्याची जबाबदारी शाखा व्यवस्थापक, शबरी महामंडळ, नंदुरबार व अंमलबजावणी यंत्रणा (देवझिरा FPC) यांची राहील. तसेच लाभार्थ्यांची यादी व Geo-tagged Photographs हे www.stcmic.gov.in/smis या वेबसाईटवर अपलोड करणे व योजनेच्या अंमलबजावणी अनुषंगाने योजनेच्या प्रगतीबाबत माहित वेळोवेळी CAS पोर्टलवर भरण्याची जबाबदारी शाखा व्यवस्थापक, शबरी महामंडळ, नंदुरबार व देवझिरा FPC यांची राहील.

२०. योजनेच्या अनुषंगाने नेमणूक करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांची मानधन देण्याची संपूर्ण जबाबदारी देवझिरा FPC यांची असेल.

२१. योजनेच्या अनुषंगाने झालेल्या खर्चाचा अहवाल (कर्मचाऱ्यांचे मानधन, प्रवास, भोजन व इतर तत्सम खर्च) वेळोवेळी व्यवस्थापकीय संचालक, शबरी महामंडळ यांना सादर करण्याची जबाबदारी देवझिरा FPC यांची राहील.

SHABARI ADIVASI VITTA VA VIKAS MAHAMANDAL MARYADIT ★ NASHIK

Devzira Farmer Producer Company Ltd Rohod Tal.Sakri Dist.Dhule ★ U01409 MH 2021 PTC365096



Scanned with CamScanner

२२. देवझिरा FPC यांनी सदर योजना राबविण्याबाबतचे वर्षनिहाय कालबद्ध कार्यक्रम निश्चित करून मंजूर तरतुदीच्या मर्यादित प्रकल्पाच्या खर्चाचा तपशील व अंमलबजावणी वेळापत्रक तयार करून शबरी महामंडळास मंजूर करणेसाठी सादर करणे बंधनकारक राहील.

२३. देवझिरा FPC योजनेंतर्गत मजूर खेळते भांडवल (Working Capital) साठी लागणारे Business Plan व Procurement Plan करून शबरी महामंडळाकडे सादर करतील.

२४. देवझिरा FPC यांना त्यांच्या सर्व सभासदांची यादी शबरी महामंडळास सादर करणे बंधनकारक राहील.

२५. योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेसाठी विविध शासकीय, अशासकीय व CSR कंपनी यांचे सोबत कृतीसंगम आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी करणे. तसेच सदर योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी इतर माध्यमातून जर निधी मिळाला असेल किंवा मिळणार असेल तर त्याची माहिती देवझिरा FPC शबरी महामंडळास देईल.

२६. देवझिरा FPC त्यांना आवश्यक असलेल्या तांत्रिक सहाय्याकरीता कृषी विभाग तसेच इतर तांत्रिक सहाय्य संस्था यांचे वेळी मार्गदर्शन व सहाय्य घेतील.

२७. योजनेचा लाभ देत असतांना विधवा, परितक्त्या, एकल महिला, दिव्यांग, अल्प व अत्यल्प भू-धारक यांना प्राधान्य देण्यात यावे.

२८. देवझिरा FPC यांना योजनेअंतर्गत येणाऱ्या लाभार्थ्यांचे योजनापूर्वी व योजना नंतरचे आर्थिक उत्पन्न यांची माहिती घेऊन त्यांच्या उत्पनात झालेली वाढ याबाबतचा सविस्तर अहवाल व्यवस्थापकीय संचालक, शबरी महामंडळ यांना सादरकरणे बंधनकारक असेल.

२९. सदर योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेसाठी व दैनंदिन कार्य योग्य पद्धतीने होण्यासाठी देवझिरा FPC यांनी नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करणे बंधनकारक असेल.

३०. देवझिरा FPC कडून योजनेविषयीची सविस्तर माहिती, सामंजस्य कराराची प्रत व इत्तर संबंधित कागदपत्र लाभार्थ्यांना वेळोवेळी दाखवण्यात यावेत.

३१. देवझिरा FPC यांनी योजनेच्या प्रगतीचा अहवाल वेळोवेळी मूल्यमापन व सनियंत्रण समिती समोर सादर करावा. तसेच समिती मार्फत देलेल्या सूचनांची अंमलबजावणी विहित वेळेत करणे बंधनकारक असेल.

३२. देवझिरा FPC यांनी मंजूर करण्यात आलेल्या निधीच्या मर्यादितच योजना राबविण्याची दक्षता घ्यावी.

**११) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाची भूमिका, जबाबदारी आणि दायित्वे**

१. योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे.

२. योजनेच्या अंमलबजावणीसाठी व्यवस्थापकीय संचालक, शबरी महामंडळ, नाशिक व देवझिरा FPC यांच्यामध्ये सामंजस्य करार करणे.

३. मंजूर तरतुदीच्या मर्यादित प्रकल्पाच्या खर्चाचा तपशील व अंमलबजावणी वेळापत्रक अंमलबजावणी यंत्रणेसोबत विचार विनिमय करून अंतिम करणे.

४. सदर योजनेच्या मूल्यमापन व सनियंत्रणासाठी लागणारा निधी योजना खर्चाचे अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही व्यवस्थापकीय संचालक, शबरी महामंडळ यांनी करावी.

५. सदर योजना राबविण्याबाबतचे वर्षनिहाय कालबद्ध कार्यक्रम निश्चित केल्यानुसार सदर योजनेची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संयुक्तपणे देवझिरा FPC व शाखा व्यवस्थापक, शबरी महामंडळ, नंदुरबार यांची राहील.

SHABARI ADIVASI VITTA VA VIKAS MAHAMANDAL MARYADIT ★ NASHIK

Dev... Farmer Producer Company Ltd Rohod Tal.Sakri Dist.Dhule ★ U01409 MH 2021 PTC...



Scanned with CamScanner

६. सादर केलेल्या कामाच्या नियोजनानुसार व टप्प्यानुसार निधीची खात्रीशीर पूर्तता करून वितरीत करणे.

७. शबरी महामंडळ सदर प्रकल्पासाठी लागणाऱ्या इतर शासकीय विभागांचे सहाय्य मिळवून देण्यास देवझिरा FPC यांना मदत करेल.

८. योजनेच्या प्रगतीबाबतची माहिती वेळोवेळी देवझिरा FPC यांचे कडून घेऊन शासनास सादर करणे.

९. देवझिरा FPC यांचेकडून त्यांनी केलेल्या कामांचा पूर्तता अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) घेणे.

१०. सदर योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेसाठी शबरी महामंडळाकडून नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करणे.

११. योजनेच्या प्रगतीपथावर असलेल्या कामकाजाचा आढावा घेण्याकरिता मूल्यमापन व सनियंत्रण समिती गठीत करणे. समितीमध्ये आवश्यकतेनुसार सदस्य/तज्ञ यांना समाविष्ट करण्याचे अधिकार मा. व्यवस्थापकीय संचालक शबरी महामंडळ, नाशिक यांना राहतील.

१२. योजनेच्या एकुण प्रस्तावित खर्च निधी पैकी २% निधी तसेच प्रकल्पातील शिल्लक निधी हा शबरी महामंडळ व्यवस्थापन खर्च म्हणून वापरता येईल.

१३. प्रकल्प क्षेत्रात वेळोवेळी भेटी देऊन देवझिरा FPC ला योजना राबविणेसाठी लागणारे सहकार्य करणे.

१४. योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी तसेच प्रगतीपथावर असलेल्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी मूल्यमापन व सनियंत्रण समितीची दर सहा महिन्यातून बैठक आयोजित करणे.

**१२) प्रकल्प व्यवस्थापन, सनियंत्रण व अहवाल पद्धती**

**१. मुल्यमापन व सनियंत्रण समिती**

सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी तसेच शेतकरी उत्पादक कंपनीचे दीर्घकालीन धोरण व निर्णयास्तव खालील प्रमाणे मुल्यमापन व सनियंत्रण समिती गठीत करण्यात येत आहे.

- व्यवस्थापकीय संचालक, शबरी आ.वि.वि.महा. मर्या., नाशिक - अध्यक्ष
- प्रकल्प अधिकारी, ए.वि.आ.प्र. धुळे - सदस्य
- महाव्यवस्थापक (प्रशा.) शबरी आ.वि.वि.महा. मर्या., नाशिक - सदस्य
- महाव्यवस्थापक (वित्त/लेखा) शबरी आ.वि.वि.महा. मर्या., नाशिक -सदस्य
- देवझिरा फार्मर प्रोड्यूसर कंपनी लिमिटेड
  मु. पो. रोहोड, ता. साक्री, जि. धुळे यांचे प्रतिनिधी -सदस्य
- विशेष आमंत्रित सदस्य -सदस्य
- शाखा व्यवस्थापक, श.आ.वि.वि.महा. मर्या., नंदुरबार - सदस्य सचिव

२. सदर समिती योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने मूल्यमापन व सनियंत्रण समिती म्हणून काम करेल. प्रगतीपथावर असलेल्या कामकाजाचा आढावा घेण्याकरिता मूल्यमापन व सनियंत्रण समितीची सहा महिन्यातून एकदा किंवा समितीने ठरविल्याप्रमाणे बैठक घेण्यात येईल. समितीमध्ये आवश्यकतेनुसार सदस्य/तज्ञ यांना समाविष्ट करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक, शबरी आ.वि.व वि. मं. नाशिक यांना राहतील.

३. योजनेची क्षेत्रीय स्तरावर अंमलबजावणी देवझिरा FPC यांचे मार्फत होईल तसेच शाखा व्यवस्थापक, श.आ.वि.वि.मं., नंदुरबार हे देवझिरा FPC ला योजना प्रभावीपणे राबविणेसाठी वेळोवेळी मदत करतील.

SHABARI ADIVASI VITTA VA VIKAS MAHAMANDAL MARYADIT * NASHIK

U01409 MH 2021 ... Farmer Producer Company Ltd. Rohod Tal.Sakri Dist.Dhule



Scanned with CamScanner

४. देवझिरा FPC योजनेचा वार्षिक कृती आराखडा (आर्थिक वर्षासाहित) शबरी महामंडळास सादर करेल ज्यामध्ये वार्षिक भौतिक व आर्थिक तपशील (नियोजन) असेल. पहिल्या वर्षाचे वार्षिक कृती आराखडा देवझिरा FPC हा सामंजस्य करार झाल्यानंतर १ महिन्यात सादर केला जाईल.

५. मुल्यमापन व सनियंत्रण समिती अपेक्षित परिणाम सुनिश्चित करण्यासाठी प्रकल्प रचना, योजना आणि परिणाम व संबधितक्षेत्राच्या learnings वर आधारित बजेटमध्ये परस्पर मान्य केलेले बदल करू शकते. ते बदल देवझिरा FPC यांचेवर लागू व बंधनकारक राहतील

६. देवझिरा FPC शबरी महामंडळ यांना प्रत्येक सहामाहीच्या शेवटी प्रगती अहवाल सादर करेल आणि वार्षिक प्रगती अहवाल वित्तीय वर्षाच्या अखेरीपासून एका महिन्याच्या आत सादर करेल. तसेच प्रत्येक आर्थिक वर्षाच्या समाप्तीच्या दोन महिन्यांत शबरी महामंडळ यांना वार्षिक लेखापरीक्षण विवरण पत्रसादर करेल.

## १३) निधी वितरीत करण्याची कार्य पद्धती

सदर योजने करिता निधी वितरीत करण्याची कार्यपद्धती पुढील प्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

१. उभय पक्षात सामंजस्य करार झाल्यानंतर व्यवस्थापकीय संचालक, श.आ.वि.मं. नाशिक हे देवझिरा FPC ला रक्कम रु.४४.०० लक्ष इतका निधी अनुदान स्वरुपात व खेळते भांडवल रक्कम रु. ५४.०० लक्ष असे एकदंर रक्कम ९८.०० लक्ष रक्कम खालील हप्त्या प्रमाणे वितरीत करतील.

| अ.क्र. | निधी वितरणाचे हप्ते | निधी वितरणाचा कालावधी | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १ | पहिला हप्ता (५० % आर्थिक अनुदान) | प्रथम वर्ष (सामंजस्य करार झाल्यानंतर) | २२.०० लक्ष |
| २ | दुसरा हप्ता (५० % आर्थिक अनुदान) | कामाच्या प्रगतीनुसार | २२.०० लक्ष |
| ३ | खेळते भांडवल (Working Capital) | प्रथम वर्ष (सामंजस्य करार झाल्यानंतर) | ५४.०० लक्ष |
| | एकूण | | **९८.०० लक्ष** |

२. देवझिरा FPC यांना लाभार्थी हिस्सा एकत्रित रक्कम रु. ११.३४ लक्ष प्रकल्पांतर्गत मंजूर बाबींसाठी खर्च करणे बंधनकारक असेल.

३. उपरोक्त नमुद निधी वितरणाची कार्यपध्दती दोन वर्षांकरीता राबविण्यात येईल.

४. संबंधित यंत्रणेने कार्यपुर्ण झाल्यानंतर आवश्यक असलेले कार्यपुर्णता व निधी विनियोग प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच पुढील निधी वर्ग करण्यात येईल.

५. योजनेच्या अनुषंगाने नेमण्यात येणारे कर्मचाऱ्यांचे मानधन देण्याची संपुर्ण जबाबदारी देवझिरा FPC यांची राहील .

६. योजनेच्या अनुषंगाने झालेल्या खर्चाचा अहवाल (कर्मचाऱ्यांचे मानधन, प्रवास, भोजन व इतर खर्च, प्रशिक्षणाचा खर्च तसेच इतर तत्सम खर्च) वेळोवेळी व्यवस्थापकीय संचालक, शबरी आ.वि.वि.महामंडळ, नाशिक यांना सादर करण्याची जबाबदारी देवझिरा FPC यांची राहील.

७. योजनेच्या एकुण प्रस्तावित खर्च निधी पैकी २% निधी तसेच प्रकल्पातील शिल्लक निधी हा शबरी महामंडळ व्यवस्थापन खर्च म्हणून वापरता येईल.



Scanned with CamScanner

### १४) खेळते भांडवल (Working Capital) परतफेड

प्रकल्पांतर्गत देण्यात येणाऱ्या रकम रु. ५४.०० लक्ष खेळते भांडवल (Working Capital) ची परत फेड खालील प्रमाणे देवझिरा FPC यांना करणे बंधनकारक असेल.

| Repayment Schedule | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Name of Project:** | Maize Procurement, Storage & Market Linkages | | | | |
| **Name of Organization:** | देवझिरा शेतकरी उत्पादक कंपनी लि., मु. पो. रोहोड, ता. साक्री, जि. धुळे | | | | |
| **Total Project Cost:** | Rs. 111.53 Lakh | | | | |
| **Working Capital:** | Rs. 54.00 Lakh | | | | |
| **Rate of Interest:** | 0% for initial 3 years | | | | |
| **Project Duration:** | 3 Years (From January 2023 to December 2025) | | | | |
| **Sr. No.** | **Month** | **Principal Amount (Rs.)** | **Interest Amount (Rs.)** | **Total Payment (Rs.)** | **Balance Amount (Rs.)** |
| 1 | Jan-24 | 225000.00 | 0.00 | 225000.00 | 5175000.00 |
| 2 | Feb-24 | 225000.00 | 0.00 | 450000.00 | 4950000.00 |
| 3 | Mar-24 | 225000.00 | 0.00 | 675000.00 | 4725000.00 |
| 4 | Apr-24 | 225000.00 | 0.00 | 900000.00 | 4500000.00 |
| 5 | May-24 | 225000.00 | 0.00 | 1125000.00 | 4275000.00 |
| 6 | Jun-24 | 225000.00 | 0.00 | 1350000.00 | 4050000.00 |
| 7 | Jul-24 | 225000.00 | 0.00 | 1575000.00 | 3825000.00 |
| 8 | Aug-24 | 225000.00 | 0.00 | 1800000.00 | 3600000.00 |
| 9 | Sep-24 | 225000.00 | 0.00 | 2025000.00 | 3375000.00 |
| 10 | Oct-24 | 225000.00 | 0.00 | 2250000.00 | 3150000.00 |
| 11 | Nov-24 | 225000.00 | 0.00 | 2475000.00 | 2925000.00 |
| 12 | Dec-24 | 225000.00 | 0.00 | 2700000.00 | 2700000.00 |
| 13 | Jan-25 | 225000.00 | 0.00 | 2925000.00 | 2475000.00 |
| 14 | Feb-25 | 225000.00 | 0.00 | 3150000.00 | 2250000.00 |
| 15 | Mar-25 | 225000.00 | 0.00 | 3375000.00 | 2025000.00 |
| 16 | Apr-25 | 225000.00 | 0.00 | 3600000.00 | 1800000.00 |
| 17 | May-25 | 225000.00 | 0.00 | 3825000.00 | 1575000.00 |
| 18 | Jun-25 | 225000.00 | 0.00 | 4050000.00 | 1350000.00 |
| 19 | Jul-25 | 225000.00 | 0.00 | 4275000.00 | 1125000.00 |
| 20 | Aug-25 | 225000.00 | 0.00 | 4500000.00 | 900000.00 |
| 21 | Sep-25 | 225000.00 | 0.00 | 4725000.00 | 675000.00 |
| 22 | Oct-25 | 225000.00 | 0.00 | 4950000.00 | 450000.00 |
| 23 | Nov-25 | 225000.00 | 0.00 | 5175000.00 | 225000.00 |
| 24 | Dec-25 | 225000.00 | 0.00 | 5400000.00 | 0.00 |
| | **Total** | **5400000.00** | | **5400000.00** | |

### १५) समाप्ती आणि परिणाम

सदर सामंजस्य करार पुढील कारणास्तव संपुष्टात आणला जाऊ शकतो...

१. कोणत्याही वेळी दोन्ही पक्षांच्या परस्पर लेखी संमतीने.

२. कोणतेही कारण न सांगता त्या संदर्भात किमान ३० दिवस अगोदर लेखी नोटीस देऊन सामंजस्य करार संपुष्टात आणण्याचा अधिकार दोन्ही पक्षांना असेल. करार संपुष्टात आणण्याच्या नोटीस मध्ये हा सामंजस्य करार संपुष्टात आणण्याचे कारण निर्दिष्ट केले जाईल. मात्र अश्या परिस्थितीत सदरील



Scanned with CamScanner

करारनामा संपुष्टात आल्यास देवझिरा FPC यांना देण्यात आलेल्या खेळते भांडवलाची तातडीने परतफेड करणे बंधनकारक राहील.

३. सामंजस्य करारात नमूद केलेल्या अटी व शर्ती बाबत सहकार्य न दिल्यास या सामंजस्य कराराचा भंग मानला जाईल आणि असहकार किंवा असहकार्यामुळे उद्भवलेल्या कोणत्याही तोटा, नुकसान किंवा हक्कांसाठी असहकार पक्ष जबाबदार असेल.

४. सामंजस्य कराराच्या समाप्ती पर्यंतच्या खर्चाच्या रकमेपेक्षा जास्त दिलेल्या आगाऊ निधीची देवझिरा FPC कडून वसुली करण्याचे हक्क शबरी महामंडळाला असतील.

५. या सामंजस्य कराराच्या पूर्ण किंवा समाप्तीमध्ये थकबाकीची अंतिम तोडगा, सेवा पूर्ण करण्याचे प्रमाणपत्र आणि मालकी माहिती न जाहिर केल्यासह अंतिम सेटलमेंट डिस्चार्ज असाइनमेंटचा समावेश असेल.

## १६) नुकसान भरपाई आणि मर्यादित उत्तरदायित्व

कोणताही पक्षकार दुसऱ्या पक्षकाराच्या या करारनाम्यात नमूद नियम आणि अटींच्या उल्लंघनसाठी कारणीभूत असणार नाही.

कोणत्याही परिस्थितीत देवझिरा FPC खालील नमूद बाबींमुळे उदभवनाऱ्या परिणामास जबाबदार राहणार नाही

१) निधी न मिळाल्यामुळे किवा मिळण्यास विलंब झाल्यामुळे प्रकल्पाच्या प्रगतीच्या टप्प्यांवर किंवा टाईमलाइनवर परिणाम झाल्यास किंवा काही अपरिहार्य कारणास्तव विलंब झाल्यास.

२) देवतेची कृती, युद्ध, बंडखोरी, क्रांती, विद्रोह किंवा सैन्य किंवा ताब्यात घेतलेली शक्ती किंवा गृहयुद्ध, दंगली, संप, कृत्ये किंवा दहशतवादाचा धोका यासारख्या चक्रव्यूहाची सक्ती इ. झाल्यास.

३) मात्र अ.न. १ व २ बाबींमुळे उदभवनाऱ्या परिणामामुळे प्रकल्प मुदत वाढीबाबतचा निर्णय सक्षम प्रधीकरणामार्फत सांगोपांग विचार विनिमयाने शबरी महामंडळामार्फत घेण्यात येईल.

## १५. नोटीस

या सामंजस्य करारानुसार आवश्यक असणारी किंवा अधिकृत केलेली कोणतीही सूचना किंवा एखादी माहिती दुसऱ्या पक्षाला द्यायची असेल तर ती नोंदणीकृत पोस्टद्वारे किंवा कुरिअरद्वारे किंवा संप्रेषणाच्या तुलनात्मक किंवा प्रेषण साधनाद्वारे पाठविली जाऊ शकते.

To,

श्री. कैलास सैल्या गांगुर्डे
अध्यक्ष
देवझिरा शेतकरी उत्पादक कंपनी लिमिटेड
मु. पो. रोहोड, ता. साक्री, जि. धुळे.

To,

मा. व्यवस्थापकीय संचालक
शबरी आदिवासी वित्तव विकास महामंडळ मर्या.
दुसरा मजला,आदिवासी विकास भवन,
राम गणेश गडकरी चौक, जुना आग्रा रोड,
नाशिक– ४२२००२.

SHABARI ADIVASI VITTA VA VIKAS MAHAMANDAL MARYADIT ★ NASHIK

Devzira Farmer Producer Company Ltd Rohod Tal.Sakri Dist.Dhule ★ U01409 MH 2021 PTC365096



Scanned with CamScanner

**१६. लवाद आणि न्यायालयांचे कार्यक्षेत्र:**

१. प्रकल्प अंमलबजावणीच्या प्रक्रियेत कोणत्याही स्वरूपाचा वाद उदभवल्यास, दोन्ही पक्ष म्हणजे शबरी महामंडळ व देवझिरा FPC यांच्या एकत्रित बैठकीद्वारे आणि विशिष्ट मुद्द्यांवर चर्चा करून व्यवस्थापकीय संचालक, शबरी महामंडळ यांचे मान्यतेने वाद मिटवतील.

२. जर मध्यस्थीची गरज भासल्यास, या सामंजस्य कराराच्या किंवा त्यानंतरच्या दोन पक्षांमधील वाद किंवा मतभेद लवादाकडे सोपविण्यात येईल. या उद्देशाने व्यवस्थापकीय संचालक, शबरी महामंडळ, नाशिक यांच्यामार्फत लवाद (Sole Arbitrator) ची नेमणूक केली जाईल.

३. लवादाच्या कारवाई संदर्भात उभयपक्ष स्वत: चा खर्च स्वतः अदा करतील.

४. वरील प्रक्रिया Arbitration and Conciliation Act, 1996 मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये राबविण्यात येईल.

५. कोणताही वाद उद्भवल्यास अथवा समजौता न झाल्यास न्यायालयीन प्रक्रियेकरिता शबरी महामंडळाचे नाशिक मुख्यालय असल्याने नाशिक हे कार्य क्षेत्र असेल.

**१७. दुरुस्ती/सुधारणा**

या सामंजस्य करारात उभयपक्षांकडून परस्परलेखी आणि विधिवत संमतीशिवाय या सामंजस्य करारात कोणतीही सुधारणा, परिशिष्ट, बदल किंवा स्पष्टीकरण वैध किंवा बंधनकारक असणार नाही.

दोन्ही पक्ष मान्य करतात की हा सामंजस्य करार कायदेशीर रित्या प्रत्येकावर बंधनकारक आहे आणि प्रत्येक पक्षाकडून एकमेकांप्रती चांगल्या विश्वासाने व कुठल्याही धाक दडपणास बळी न पडता मुक्त संमतीने करण्यात आलेला आहे.

SHABARI ADIVASI VITTA VA VIKAS MAHAMANDAL MARYADIT ★ NASHIK

Devzira Farmer Producer Company Ltd Rohod Tal.Sakri Dist.Dhule ★ U01409 MH 2021 PTC365096



Scanned with CamScanner

येणे प्रमाणे साक्षीदारांसमक्ष अधिकृत अधिकारांच्या स्वाक्षऱ्यानिशी हा करारनामा नमूद दिनांकावर पार पाडण्यात आला.

| **पक्ष नं. २** देवझिरा शेतकरी उत्पादक कंपनी लि., मु. पो. रोहोड, ता. साक्री, जि. धुळे | **पक्ष नं. १** शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित,नाशिक. |
|---|---|
| President / Vice President Sachiv<br>Devzira Farmer Producer<br>Company Limited Rohod<br>Tal.Sakri Dist.Dhule<br><br>१) **नावं :** श्री. कैलास सैल्या गांगुर्डे<br>**पद :** अध्यक्ष<br><br>President Vice President Sachiv<br>Devzira Farmer Producer<br>Company Limited Rohod<br>Tal.Sakri Dist.Dhule<br><br>२) **नावं :** श्री. सौ. हिराबाई सोमनाथ गांगुर्डे<br>**पद :** सचिव | Leena M Bansod<br>व्यवस्थापकीय संचालक<br>शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या.<br>नाशिक-२<br><br>**नावं :** श्रीमती. लीना बनसोड (भा. प्र. से.)<br>**पद :** व्यवस्थापकीय संचालक |

**साक्षीदार** 28/12/2022

१. Shri J.N. Abhale
General Manager
MSCTDC, Nashik

**नावं** :
**पदनाम :**

३.

**नावं** : पंडीत चैत्राम नगराय
**पदनाम :** संचालक

२.

**नावं** : बाबासाहेब ए. थिंदे
**पदनाम :** महाव्यवस्थापक (वित्त).

४.

**नावं** : पंडीत गोविंदा चौधरी
**पदनाम :** संचालक

**Enclosure:** १. शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक, जा.क्र. शआविविम/ के.सहा. / प्रकल्प/७०३/२२ दि. २८.१२.२०२२ च्या पत्रान्वये निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचना.



Scanned with CamScanner